क्र९/जिपुअ/क.लि.गो/हमाल कंत्राट/कावि/३६२ /२०१८

**जिल्हाधिकारी नागपूर यांचे कार्यालय नागपूर**

नागपूर, दिनांक ०३ / ११ /२०१८

## महाराष्ट्र शासन

## ( अन्न नागरी पूरवठा विभाग व ग्राहक संरक्षण विभाग )

## शासकीय धान्य गोदामातील अन्नधान्याच्या हाताळणूकीसाठी

## हमाल कंत्राट सन २०१८ ते २०२१ निश्चित करण्याबाबत

## ई - निविदा सुचना

## (दुसरी वेळ)

महाराष्ट्र शासन अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग मंत्रालय मुंबई शासन निर्णय क्र. कंत्राट-१२१७/प्र.क्र.९८/ना.पु.१६-अ दिनांक ८/५/२०१८ ( www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर संगणक सांकेतांक २०१८०५०८१७३२३५५५०६ उपलब्ध करण्यात आलेला आहे.) अन्वये महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशान्वये व त्यांचे वतीने जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडून सन २०१८ ते २०२१ या कालावधीकरिता नागपूर जिल्हयासाठी शासकीय गोदामातील अन्नधान्य, साखर, तुरदाळ, भरडधान्य यासारखे धान्य व इतर वस्तू हाताळणूकीसाठी हमाल संस्थेची नेमणूक करण्याकरिता पुढील अटी व शर्तीनुसार हमाल कंत्राट निश्चित करण्यासाठी खुल्या निविदांसाठी सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय क्रमांक मातंसं/नस्ती २०१२/प्र.क्र.२७३/३९ दिनांक २६ नोव्हेंबर २०१४ मधील सुचनांनुसार, त्याचप्रमाणे उद्योग उर्जा व कामगार विभागाचा शासन निर्णय क्रमांक भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उद्योग-४ दिनांक १/१२/२०१६ मधील तरतुदीनुसार खुली ई-निविदा मागविण्यात येत आहे.

**१. जिल्हायातील गोदाम संख्या व नियतनः-**

नागपूर (ग्रामीण) जिल्हयात एकूण १३ तालूके असून त्यापैकी नागपूर (ग्रामीण) तालुका वगळता एकुण १२ शासकीय धान्य गोदामे असून १२ शासकिय धान्य गोदामाकरिता निविदा मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | तालूक्याचे नांव | शासकीय गोदामाचे नांव | अन्नधान्याचे वार्षीक नियतन क्विंटल मध्ये | | सन २०१७-१८ मधील अन्नधान्याचे एकूण नियतन गोदामनिहाय क्विंटल मध्ये | सन २०१७-१८ मध्ये दिलेली एकूण गोदामनिहाय हमालीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | गहू | तांदूळ | | |
| १ | हिंगणा | हिंगणा | 35276 | 25464 | 60740 | 2934678 |
| २ | कामठी | कामठी | 49700 | 39500 | 89200 | 3527442 |
| ३ | मौदा | मौदा | 35880 | 29540 | 65420 | 2713128 |
| ४ | रामटेक | रामटेक | 49400 | 39450 | 88850 | 3318043 |
| ५ | पारशिवनी | पारशिवनी | 40300 | 31950 | 72250 | 2923623 |
| ६ | उमरेड | उमरेड | 30425 | 28130 | 58555 | 3081299 |
| ७ | भिवापूर | भिवापूर | 30504 | 24570 | 55074 | 1704209 |
| ८ | कुही | कुही | 37040 | 32280 | 69320 | 2442105 |
| ९ | सावनेर | सावनेर | 62900 | 50480 | 113380 | 4415242 |
| १० | कळमेश्वर | कळमेश्वर | 30467 | 26686 | 57153 | 2235584 |
| ११ | काटोल | काटोल | 34250 | 28350 | 62600 | 3254410 |
| १२ | नरखेड | नरखेड | 36100 | 35950 | 72050 | 3088026 |
| | एकुण | | 472242 | 392350 | 864592 | 3,56,37,789/- |

२. **वाराई बाबत सुचना** :-

उद्योग ऊर्जा व कामगार विभागाच्या दि. ६ सप्टेंबर २०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार कोणत्याही मंडळाने फक्त वाराईकरिता नव्याने कामगार नोंदित करू नयेत अश्या सुचना दिलेल्या आहेत. तसेच भराई, उतराई करण्याच्या कामामध्ये वाराईच्या स्वरूपाच्या कामाचा अंतर्भाव असल्याचे स्पष्ट केलेले असल्याने व शासकीय धान्य गोदामात फक्त वाराईच्या कामासाठी हमाल कामगारांची स्वतंत्र टोळी कार्यरत नसल्याने **यापुढे शासकीय गोदामात अन्नधान्य हाताळणूकीसाठी कोणत्याही प्रकारची वाराई वेगळयाने दिली जाणार नाही याची निविदाकार संस्थांनी नोंद घ्यावी**.

२. **शासकीय गोदामातील अन्नधान्य हाताळणूकीचे बाबनिहाय काम** :-

शासकीय गोदामात अन्नधान्य हाताळणूकीच्या बाबनिहाय कामामध्ये बदल करण्यात आलेला असून पुर्वी C(२)(१) अंतर्गत चालणारे काम आता अ(एक) म्हणून चालेल तर पूर्वी ब(५) अंतर्गत चालणारे काम आता ब(दोन) म्हणून चालेल याची निविदाकार संस्थांनी नोंद घ्यावी.

२.१ **शासकीय गोदामातील अन्नधान्य हाताळणूक मजूरीच्या कामाची बाबनिहाय अनुसूची** :-

(शासन निर्णय दि.८/५/२०१८ मधील परिशिष्ठ अ परिच्छेद क्र.१० नुसार)

**प्रत्येकी १ क्विंटल साठीचे दर**

(अ) **धान्याचे प्रमाणीकरण करणे**.

(**एक**) ट्रक/गाडयांमध्ये रचून ठेवलेल्या गोण्याची थप्पी मोडून त्या गोण्या वजन काटयाजवळ नेणे, प्रमाणीकरणामध्ये गोण्यांमध्ये धान्य घालून किंवा गोण्यांमधून धान्य काढून वजन करणे, गोण्या हलवणे, प्रमाणिकृत गोण्या शिवणे आणि अंदाजे १६ थरांपर्यंत थप्पी लावून रचणे.

(**दोन**) गोदामामध्ये रचून ठेवलेल्या गोण्याची थप्पी मोडून त्या गोण्या वजन काटयाजवळ नेणे, प्रमाणिकरणामध्ये गोण्यांमध्ये धान्य घालून किंवा गोण्यांमधून धान्य काढून वजन करणे, गोण्या हलविणे, प्रमाणिकृत गोण्या शिवणे आणि अंदाजे १६ थरांपर्यंत थप्पी लावून रचणे किंवा ट्रकमध्ये/ गाडयांमध्ये वाहून नेवून थप्पी रचणे.

(**तीन**) (दोन) साठी जसे त्याचप्रमाणे पाला न करता पुन्हा गोण्यांमध्ये भरणे, म्हणजे थप्पी रचून ठेवलेल्या गोण्या खाली उतरवणे, त्यातील धान्य नविन गोण्यांमध्ये ओतणे, अचुक वजन करणे गोण्याची तोंड शिवणे आणि त्याच गोदामामध्ये अंदाजे १६ थरांपर्यंत थप्पी रचणे किंवा ट्रकमध्ये/ गाडयांमध्ये वाहून नेवून थप्पी रचणे.

(ब) **गोदामामध्ये गोण्या भरणे**, **उतरवणे आणि थप्पी लावणे**.

(**एक**) गाडीमधून किंवा ट्रक्समधून गोण्यांची थप्पी मोडून खाली उतरवणे आणि वजन न करता, परंतू सर्व भारासहीत उचलणे या कामासह अंदाजे १६ थरांच्या उंचीपर्यंत गोदामांमध्ये थप्पी रचून ठेवणे.

(**दोन**) गोदामात लावलेल्या थप्पीवरून गोण्या काढणे, त्यांचे वजन न करता सर्व भारासहीत त्याउचलणे व गोदामाजवळच्या ट्रकमध्ये/गाडयांमध्ये वाहून नेवून थप्पी रचणे.

(**तीन**) गाडयांमधून किंवा ट्रकमधून गोण्यांची थप्पी मोडून खाली उतरवणे, गोण्यांचे वजन करणे आणि गोदामात अंदाजे १६ थरांच्या थप्पी रचून ठेवणे.

(**चार**) गोदामातील थप्पी वरून गोण्या काढणे, त्यांचे वजन करणे व ट्रकमध्ये किंवा गाडयांमध्ये नेवून थप्पी रचणे.

(**पाच**) गोदामातील थप्पीवरून गोण्या काढणे, वजन न करता किरकोळ विक्रेते/ घाऊक व्यापारी यांना देण्यासाठी ट्रकमध्ये किंवा गाडयांमध्ये नेवून थप्पी रचणे.

**टीप**:- उपरोक्त (पाच) बाबतीत किरकोळ विक्रेते/घाऊक व्यापारी यांच्या गाडयामध्ये माल भरताना त्यामालाची जबाबदारी किरकोळ विक्रेते/घाऊक व्यापारी यांच्यावर आहे.

(**सहा**) वाराफेरी (कोणत्याही कारणास्तव पुनर्व्यवस्था किंवा एकाच इमारतमधील गोदामांमध्ये वजन न करता गोण्या रचण्याकरिता अन्य कोणतीही हलवाहलव)

**टीप**:- पडलेले धान्य झाडणे इत्यादी काम शासनाने नेमलेल्या पालावाल्याकडून करून घेण्यात यावे.

**(क)** **गोदामामधील इतर कामकाज**:-

**(एक)** स्थानीक भागातून धान्य खरेदी करताना शेतक-यांकडून किंवा इतर पुरवठादाराकडून धान्य घेण्यासाठी गोण्या देणे, त्या भरून तागडीजवळ नेणे, वजन करणे, प्रमाणीकरण करणे, शिवणे आणि गोदामामध्ये अदमासे सोळा थर इतक्या उंच थप्पी रचून ठेवणे.

**(दोन)** इतर कामासाठी गोण्या नेण्याची आवश्यकता असल्यास, प्रत्येकी एक क्विंटल (निव्वळ) इतके प्रत्यक्ष वजन केलेल्या १०० गोण्यांमागे-------- (प्रमाणीकरण केलेल्या गोण्या) वजनाची चाचणी घेणे.

टीपः-वजनाच्या चाचणीसाठीचा हा दर गोण्या थप्पीने रचणे किंवा खाली उतरवणे इत्यादी सारख्या कोणत्याही गौण कामाकरिता विचारात घेतला जाणार नाही.

**(तीन)** थप्पीवरून गोण्याखाली उतरवणे व त्या तेथून हलवणे, त्यातील धान्य नविन गोण्यांमध्ये ओतून त्या रिकाम्या करणे, त्या शिवणे आणि त्या थप्पीने रचून ठेवणे.

**(ड)** **कामांच्या इतर संकीर्ण बाबी**:-

**(एक)** वाधिणीमधून रिकाम्या गोण्यांच्या गासडया किंवा गठ्ठे किंवा सुतळीच्या गासडया / दो-याचे पॅकेट (प्रत्येकी ३१८ ते ४०९ कि.ग्रॅ.) उतरवणे आणि थेट ट्रक्समध्ये किंवा गाडयांमध्ये भरणे.

**(दोन)** ट्रक्समधून किंवा गाडयांमधून (प्रत्येकी ३१८ ते ४०९ कि.ग्रॅ.)रिकाम्या गोण्यांच्या गासडया किंवा गोण्यांचे गठ्ठे किंवा सुतळीच्या गासडया/दो-याचे पॅकेट उतरवणे आणि गोदामामध्ये थप्पीने रचणे.

**(तीन)** १०० रिकाम्या गोण्या व्यवस्थीत बांधून त्याचे गठ्ठे तयार करणे आणि ते गोदामामध्ये थप्पीने रचणे.

**(चार)** ताडपत्र्या गोदामामध्ये ठेवणे.

**(पाच)** ताडपत्र्या गोदामामधून बाहेर काढणे.

**(सहा)** एकाच गोदामामध्ये रिकाम्या गोण्याचे गठ्ठे इकडून तिकडे नेण्यासाठी वाराफेरी.

**३.** **निविदेतील दर** :-

**शासकीय गोदामातील अन्नधान्य हाताळणूकीसाठी मागविण्यात येणारे हमाली कामाचे दर हे प्रति क्विंटलसाठी आहेत**. याची निविदाकार संस्थांनी नोंद घ्यावी.

पूर्वी प्रति ५० किलोच्या गोणीचे दर/ प्रति टन दर / १०० पोत्याचे दर निश्चित केलेले होते. त्या ठिकाणी आता ५०किलोच्या दोन गोणींचे दर एकत्र करून दर निविदेत दयावेत.)

४. **हमाली कामाचे आधारभूत दर** :-

शासकीय गोदामातील अन्नधान्य हाताळणूकीच्या **मजूरीच्या कामाचे बाबनिहाय आधारभूत दर प्रत्येकी १ क्विंटल साठीचे दर** खालीलप्रमाणे आहे.

| अ क्र | शासकीय गोदामातील अन्नधान्य हाताळणूक मजूरीच्या कामाची बाब | कामाचे विवरण | आधारभूत दर प्रति क्विंटल साठी |
|---|---|---|---|
| १ | **अ) धान्याचे प्रमाणीकरण करणे**. | (**एक**)ट्रक /गाडयांमध्ये रचून ठेवलेल्या गोण्याची थप्पी मोडून त्या गोण्या वजन काटयाजवळ नेणे, प्रमाणीकरणा मध्ये गोण्यांमध्ये धान्य घालून किंवा गोण्यांमधून धान्य काढून वजन करणे, गोण्या हलवणे, प्रमाणिकृत गोण्या शिवणे आणि अंदाजे १६ थरांपर्यत थप्पी लावून रचणे. | 23.70 |
| २ | **ब) गोदामामध्ये गोण्याभरणे, उतरवणे आणि थप्पी लावणे** | (**दोन**) गोदामात लावलेल्या थप्पीवरून गोण्या काढणे, त्यांचे वजन न करता सर्व भारासहीत त्या उचलणे व गोदामाजवळच्या ट्रकमध्ये/गाडयांमध्ये वाहून नेवून थप्पी रचणे. | 6.56 |

**टीप** :- **शासन निर्णय दिनांक ८/०५/२०१८ मधील मजूरीच्या कामाच्या बाबींची अनुसूची मध्ये समाविष्ट असलेल्या अ,ब,क,ड मधील इतर धान्य हाताळणुकीच्या प्रक्रिया वरील दरात समाविष्ट आहे**.

५. **निविदा प्रक्रियेसाठीचे निविदाकार संस्थांचे स्पर्धात्मक दर** :-

निविदा प्रकिया ही वरीलप्रमाणे विहित हमालीच्या बाब निहाय आधारभुत दरांवरील स्पर्धात्मक दरांवर राबविण्यात येईल. त्यासाठी निविदाकार संस्थांनी हमालीच्या बाबनिहाय आधारभुत दरांवर स्पर्धात्मक दर भरावेत.

निविदाकाराने शासन निर्णयातील सर्व तरतूदी, प्रत्यक्ष खर्च/ नफा या बाबी विचारात घेऊन **हमाल कामगारांना देय असलेल्या सर्व बाबनिहाय आधारभूत दरांवर एकत्रितरित्या टक्केवारीच्या प्रमाणात निविदेत दर नमूद करावेत**. याची निविदाकार संस्थांनी नोंद घ्यावी.

६. **कंत्राट कालावधी** :-

नागपूर जिल्हयातील तालुक्याअंतर्गत असलेल्या शासकीय गोदामातील अन्नधान्याच्या हाताळणूकीसाठी हमाल कंत्राटाचा कालावधी त्या त्या जिल्हयातील चालू वाहतूक कंत्राट संपेपर्यंत किंवा ३ वर्षे यापैकी जे अगोदर घडेल तितका असेल. ज्या तारखेला निविदाकाराशी करारनामा करण्यात येईल, त्या तारखेपासून कालावधी सुरु होऊन तो वरील प्रमाणे विहित कालावधीकरीता असेल. जेव्हा आवश्यकता असेल तेव्हा कंत्राटाचा कालावधी दोन महिन्यापर्यंत वाढविण्यात येईल. तद्‍नंतर मुदतवाढीसाठी शासनाची मंजूरी घेण्यात येईल.

७. **निविदा प्रकिया राबविण्याची जबाबदारी** :-

७.१ नागपूर जिल्हयातील तालुकातंर्गत असलेल्या तेरा शासकीय गोदामातील (गोदाम निहाय) अन्नधान्याच्या हाताळणूकीसाठी हमाल कंत्राटासाठी खुली ई-निविदा प्रक्रिया निश्चित करण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी, नागपूर यांची राहील.

७.२ निविदेचा तांत्रीक लिफाफा उघडणे, निविदाकारास तांत्रीकदृष्टया पात्र ठरविणे, दराचा लिफाफा उघडणे व प्रदान केलेल्या अधिकार मर्यादेमध्ये निविदा दर मंजूर करणे इत्यादी अधिकार जिल्हास्तरीय निविदा समितीस राहील.

७.३ खुल्या निविदांसाठी सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय क्रमांक मातंसं/नस्ती २०१२/ प्र.क्र.२७३/३९ दिनांक २६ नोव्हेंबर २०१४ मधील सुचनांनुसार, त्याचप्रमाणे उद्योग उर्जा व कामगार विभागाचा दिनांक १/१२/२०१६ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार खुली ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात येईल.

७.४ संपूर्ण निविदा प्रक्रिया पूर्ण करणे व दर मंजूर झालेल्या निविदाकराशी विहित कालावधीत करारनामा करण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी, नागपूर यांची राहील.

८. **कंत्राट निश्चितीची कार्यपध्दती** :-

८.१ नागपूर जिल्हयातील शासकीय गोदामातील अन्नधान्य हाताळणूक कामाचे **हमाल कंत्राटासाठी खुली ई-निविदा प्रक्रिया करतांना प्रथम प्रत्यक्ष हमालीचे काम करणारे सदस्य यांच्या नोंदणीकृत हमाल कामगार सहकारी संस्था व हमाल सदस्य असलेल्या सहकारी संस्थांकडून खुल्या ई-निविदा मागविण्यात येत आहे**. याची निविदाकार संस्थांनी नोंद घ्यावी.

८.२ तसेच वरील ८.१ मध्ये नमूद **नोंदणीकृत हमाल कामगार सहकारी संस्थानी निविदेमध्ये भाग घेत नसल्यास नोंदणीकृत बेरोजगारांच्या सेवा सहकारी संस्थाकडून खुल्या ई-निविदा मागविण्यात येईल**.

८.३ ज्या संस्था सन २००८किंवा त्यापासून पुढे शासकीय गोदामातील अन्नधान्य हाताळणुकीचे काम करत आहेत व अशा संस्थांना निविदेमध्ये भाग घ्यावयाचा असेल तर पुर्वीच्या कामाच्या ठिकाणची मजुरी व त्यावरील लेव्ही, ज्या जिल्हयांमध्ये मजूरी रोख दिली जात होती अशा जिल्हयांच्या बाबतीत मजूरीवरील संपूर्ण लेव्ही, थकीत महागाई निर्देशांक वाढ प्राप्त झालेली असल्यास त्यावरील लेव्ही या संस्थांनी माथाडी मंडळात भरणा केलेली असणे आवश्यक आले. याबाबतची आवश्यक कागदपत्रे सादर करणे बंधनकारक राहील. अन्यथा अशा संस्थाना निविदा प्रक्रियेत भाग घेता येणार नाही. तसेच ज्या संस्थांनी हमाल कामगारांची आर्थिक देणी न दिल्याबाबत त्यांच्या विरुध्द माथाडी मंडळाने माथाडी कायद्यांतर्गत गुन्ही नोंदविलेले असतील अशा संस्थांना निविदा प्रक्रियेत भाग घेण्यास मज्जाव करण्यात येईल.

**९. निविदेच्या पात्रतेचे निकष व अटी -शर्ती :-**

**९.१ निविदाकार संस्थेचा अनुभव :-**

निविदाकार संस्थेला **कोणत्याही गोदामावरील हमाली कामाचा १ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे**. (यामध्ये ट्रकमधून ५० किलोच्या गोण्या उतरविणे, त्यांचे प्रमाणिकरण करणे, त्यांची गोदामामध्ये थप्पी लावणे, गोदामातील थप्पी मोडून गोण्या ट्रकमध्ये थप्पी लावून देणे या प्रकारच्या कामाचा अनुभव अत्यावश्यक आहे.)

**९.२ निविदाकार संस्थेची उलाढाल :-**

९.२.१ नागपूर जिल्हयातील शासकीय गोदामातील अन्नधान्य हाताळणूक कामाचे हमाल कंत्राटासाठी निविदाकार संस्थेची आर्थीक उलाढाल शासकीय गोदामनिहाय खालीलप्रमाणे असणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | तालूक्याचे नांव | शासकीय गोदामाचे नांव | आर्थीक उलाढाल रक्कम रूपये |
|---|---|---|---|
| १ | हिंगणा | हिंगणा | 1467339 |
| २ | कामठी | कामठी | 1763721 |
| ३ | मौदा | मौदा | 1356564 |
| ४ | रामटेक | रामटेक | 1659022 |
| ५ | पारशिवनी | पारशिवनी | 1461812 |
| ६ | उमरेड | उमरेड | 1540650 |
| ७ | भिवापूर | भिवापूर | 852105 |
| ८ | कुही | कुही | 1221053 |
| ९ | सावनेर | सावनेर | 2207621 |
| १० | कळमेश्वर | कळमेश्वर | 1117792 |
| ११ | काटोल | काटोल | 1627205 |
| १२ | नरखेड | नरखेड | 1544013 |
| | एकुण | | 1,78,18,897/- |

९.२.२ एखादया निविदाकार संस्थेस नागपूर जिल्हयातील शासकीय गोदामातील अन्नधान्य हाताळणूक कामाचे हमाल कंत्राटासाठी **एकापेक्षा अधिक शासकीय गोदामात निविदा दाखल करावयाच्या असल्यास अशा निविदाकार संस्थेची आर्थीक उलाढाल ही सदर संस्था जेवढया गोदामात निविदा दाखल करील तेवढया गोदामांच्या ( वरील परिच्छेद ९.२.१ मधील गोदामनिहाय ) आर्थीक उलाढाल ऐवढी असणे आवश्यक आहे**.
(एखादया संस्थेने तीन गोदामात निविदा भरल्यास सदर संस्थेची आर्थीक उलाढाल ही तीनही गोदामाच्या आर्थीक उलाढाल ऐवढी असणे आवश्यक आहे.)

**९.३ निविदा अर्ज शुल्क व इसा-याची रक्कम :-**

९.३.१ शासकीय गोदामातील अन्नधान्य हाताळणूक कामाचे हमाल कंत्राटासाठी **निविदा अर्ज शुल्क रू. ५०००/- राहील.** ( आधी निविदा भरलेल्या निविदाकार यांना निविदा अर्ज शुल्क रु.५०००/- भरणे पासून सुट राहील मात्र त्यांनी पूर्वी रु.५०००/- निविदा अर्ज शुल्क भरलेली पावती ऑनलाईन अपलोड करणे आवश्यक आहे.)

९.३.२ **हमाल कंत्राटातील निविदेची इसारा रक्कम गोदाम निहाय खालीलप्रमाणे राहील**.

| अ.क्र | तालुका /गोदामाचे नाव | मागील आर्थिक वर्षाची एकुण हमाली खर्च | एकुण खर्चाचा २% एवढी इसारा रक्कम |
|---|---|---|---|
| १ | हिंगणा | 2934678 | 58694 |
| २ | कामठी | 3527442 | 70549 |
| ३ | मौदा | 2713128 | 54263 |
| ४ | रामटेक | 3318043 | 66361 |
| ५ | पारशिवनी | 2923623 | 58472 |
| ६ | उमरेड | 3081299 | 61626 |
| ७ | भिवापूर | 1704209 | 34084 |
| ८ | कुही | 2442105 | 48842 |
| ९ | सावनेर | 4415242 | 88305 |
| १० | कळमेश्वर | 2235584 | 44712 |
| ११ | काटोल | 3254410 | 65088 |
| १२ | नरखेड | 3088026 | 61761 |
| | एकुण | 3,56,37,789/- | 7,12,756/- |

९.३.३ निविदेची **इसा-याची रक्कम ऑनलाईन पध्दतीने भरावी**. याची निविदाकार संस्थांनी नोंद घ्यावी.

९.३.४ ज्या निविदाकार संस्था इसारा रक्कम ऑनलाईन पध्दतीने भरेल, त्यांना निविदा भरणे बंधनकारक राहील.

९.३.५ निविदेत नमुद केलेली इसारा रक्कम पेक्षा कमी रक्कम भरणा-या निविदाकार संस्थेची / निविदाधारकाची निविदा अपात्र ठरविण्यात येईल.

९.३.६ निविदा उघडल्यानंतर न्यूनतम निविदाकार व्यतिरिक्त उर्वरीत सर्व पात्र / अपात्र निविदाकार संस्थेची/निविदाधारकाची इसारा रक्कम सात दिवसात परत करण्यात येईल

९.३.७ इसारा रकमेवर कुठल्याही प्रकारे व्याज देय राहणार नाही.

९.३.८ **निविदाकाराकडून खालील बाबींची पुर्तता न झाल्यास इसा-याची रक्कम जप्त करण्यात येईल**.

१. निविदा स्विकारण्याच्या अंतिम दिनांकानंतर निविदा किंवा प्रस्ताव मागे घेणे किंवा त्यात फेरफार करणे.

२.निविदा मंजूर झाल्यानंतर करारनाम्यावर सही न करणे.

३.निविदा किंवा प्रस्ताव स्विकारण्यात आल्यानंतर करारानुसार कामगिरीसाठी आवश्यक सुरक्षा अनामत न भरणे.

४.शासन निर्णय दिनांक ८/५/२०१८ व निविदेतील अटी व शर्ती प्रमाणे करारावर सही करण्यापूर्वी कोणत्याही अन्य अटींची पूर्तता न करणे.

**९.४ अनामत रक्कम :-**

९.४.१ ज्या निविदाकार संस्थेची/ निविदाकाराची निविदा मंजूर होईल. त्या निविदाकार संस्थेकडून/ निविदाकाराकडून करारनामा करण्यापूर्वी गोदाम निहाय संबंधित शासकिय गोदामात मागील तीन वर्षात झालेल्या हमाली कामाचे एकुण सरासरी खर्चाच्या ३% **इतकी अनामत रक्कम खालील कोणत्याही स्वरूपात घेण्यात येईल**.

| अ. क्र | तालुका /गोदामाचे नाव | मागील तीन वर्षात झालेल्या हमाली खर्चाची सरासरी | एकुण सरासरी खर्चाचा ३% एवढी अनामत रक्कम |
|---|---|---|---|
| 1 | **हिंगणा** | 2123940 | 63718 |
| 2 | **कामठी** | 2884835 | 86545 |
| 3 | **मौदा** | 2256125 | 67684 |
| 4 | **रामटेक** | 2725729 | 81772 |
| 5 | **पारशिवनी** | 2245177 | 67355 |
| 6 | **उमरेड** | 2807856 | 84236 |
| 7 | **भिवापूर** | 1451015 | 43530 |
| 8 | **कुही** | 2015516 | 60465 |
| 9 | **सावनेर** | 3709618 | 111289 |
| 10 | **कळमेश्वर** | 1906323 | 57190 |
| 11 | **काटोल** | 2780467 | 83414 |
| 12 | **नरखेड** | 2631176 | 78935 |
|  | **एकुण** | 29537777 | 886133 |

१. ज्या निविदाकार संस्थेची / निविदाधारकाची निविदा मंजूर होईल त्यांनी नागपूर शहरात देय होणारा डिमांड ड्राफ्टव्दारे.

२.कोणत्याही अनुसूचित वाणिज्यिक बॅक/ राष्ट्रीयकृत बॅकेतील कराराच्या कालावधीत वैध राहणा-या बॅकेच्या हमीव्दारे.

९.४.२ बँक गॅरंटीच्या सत्यतेची पडताळणी संबंधित बँकेकडून करण्यात येईल.

९.४.३ शासकीय गोदामातील हमाल कंत्राट कराराच्या पूर्ण कालावधीसाठी बँक गॅरंटी वैध राहील याची निविदा मंजूर होणा-या निविदाकार संस्थेनी/ निविदाकाराने दक्षता घ्यावी.

९.४.४ ज्या तारखेला निविदाकार संस्था/ निविदाकाराची निविदा मंजूर करण्यात येईल. त्या तारखेपासुन पंधरा दिवसाच्या आत अनामत रक्कम कार्यालयास सादर करावी लागेल. असे न केल्यास, संबंधित संस्थेचा/ निविदाकाराचा कंत्राट रद्द करण्याची कारवाई जिल्हाधिकारी, नागपूर करू शकेल.

**९.५ प्रतिभूती ठेवीची रक्कम :-**

९.५.१ ज्या निविदाकार संस्था/ निविदाकाराची निविदा मंजूर करण्यात येईल. त्या निविदाकार संस्था/ निविदाकाराची इसारा रक्कम प्रतिभूती ठेवीमध्ये परावर्तीत करण्यात येईल.

९.५.२ प्रतिभूती ठेवीच्या रक्कमेवर कुठल्याही प्रकारचे व्याज देय राहणार नाही.

**९.६ बँक गॅरंटी व प्रतिभूती ठेव यांचा वापर खालील परिस्थितीत करण्यात येईल :-**

९.६.१ निविदाकार संस्था/ निविदाकाराने अन्नधान्य हाताळणूकीचे काम अचानक थांबविल्यास पर्यायी व्यवस्थेकरिता आलेल्या खर्चाची वसुली बँक गॅरंटी व प्रतिभूती ठेव मधून करण्यात येईल.

९.६.२ निविदाकार संस्था/ निविदाकार यांच्यावर आकारण्यात आलेला दंड वसूल करण्याकरिता अन्य पर्याय शिल्लक नसल्यास दंडाची वसुली बँक गॅरंटी व प्रतिभूती ठेव मधून करण्यात येईल.

९.६.३ निविदाकार संस्था/ निविदाकाराचा हमाल कंत्राट संपलेला आहे परंतू त्याच्याकडून काही येणे आहे, किंवा वसूली आहे. ती वसूली करण्यासाठी अन्य पर्याय नसतील अशा वेळी सदर रक्कम प्रतिभूती ठेवी व बँक गॅरंटीमधून वसूल करण्यात येईल.

**१०. निविदा पध्दती - व्दि लिफाफा पध्दती :-**

१०.१ ई-निविदेसाठी अनूसरावयाची कार्यपध्दती आणि मार्गदर्शक सूचना http//mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. त्यानुसार कार्यवाही करण्यात येईल.

१०.२ निविदेकरिता व्दि लिफाफा पध्दतीचा अवलंब करण्यात येईल. यामध्ये पहिला लिफाफा हा **तांत्रीक "अ" लिफाफा** असेल ज्यामध्ये निविदाकार संस्था/ निविदाकार यांना **तांत्रीक "अ"** लिफाफा मध्ये सादर करावयाच्या कागदपत्रांची सुचीनुसार संपूर्ण कागदपत्रे निविदेतील अटी व शर्ती नुसार स्वाक्षरी करून सादर करावे लागेल.

१०.३ निविदेमध्ये कोणतेही अटीयुक्त दर स्विकारण्यात येणार नाहीत.

**१०.४ ई-निविदा कालावधी :-**

| अक्र | कार्यवाहीचा टप्पा | पूर्ण करण्याकरिता शेवटचा दिनांक |
|---|---|---|
| १ | निविदा जाहीरात प्रसिध्द करणे | 05 / 11 / 2018 |
| २ | Pre Bid Meeting घेणे | 13 / 11 / 2018 |
| ३ | ऑनलाईन ई-निविदा भरणे | 05 / 11 / 2018 |
| ४ | ई-निविदा सादर करावयाचा अंतिम दिनांक | 22 / 11 / 2018 |
| ५ | ई-निविदा उघडणे | 26 / 11 / 2018 |

**१०.५ तांत्रीक लिफाफा "अ" मध्ये सादर करावयाची कागदपत्रे :-**

नागपूर जिल्हयातील शासकीय गोदामातील अन्नधान्य हाताळणूक कामाचे हमाल कंत्राट सन २०१८ ते २०२१ साठी निविदाकार संस्थेने/ निविदाकाराने ई-निविदेतील **लिफाफा** "**अ**" मध्ये (**तांत्रीक लिफाफा** ) खालीलप्रमाणे कागदपत्रे सादर करावयाची आहे.

| अ.क्र. | कागदपत्राची सुची |
|---|---|
| १ | संस्थाचा नोंदणी दाखला व नियमावलीची सत्यप्रत. |
| २ | संस्था माथाडी मंडळाकडे मालक म्हणून नोंदीत असल्या बाबतचे प्रमाणपत्र. |
| ३ | जीवनावश्यक वस्तु अधिनियम १९५५ महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व महाराष्ट्र माथाडी हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण ) अधिनियम १९६९ खाली गुन्हा दाखल होऊन दंड अथवा शिक्षा झाली नसल्याबाबतचे शपथपत्र. |
| ४ | शासन निर्णयातील सर्व तरतूदी, अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे व त्यास बांधील असल्याचे, तसेच निविदेमध्ये सादर केलेली माहीती बरोबर असून ती चुकीची असल्याचे सिध्द झाल्यास शिक्षेस बांधिल असल्याबाबतचे शपथपत्र. |
| ५ | निविदाकाराचा PAN क्रमांक अथवा TAN क्रमांक, कागदपत्रांची साक्षांकित प्रत. |
| ६ | अनुभव प्रमाणपत्र व आर्थीक उलाढाल दर्शविणारे सनदी लेखापालाचे प्रमाणपत्र व ज्या ठिकाणी अनुभवामध्ये नियतन विचारात घेतले असेल अशा ठिकाणी जिल्हा पूरवठा अधिकारी अथवा गोदामाशी संबंधित जबाबदार समकक्ष अधिकारी यांचे प्रमाणपत्र (परिच्छेद (९.१) व (९.२)नुसार, तसेच उपरोक्त प्रमाणपत्र काळातील संस्थेच्या लेखापरिक्षण अहवालाची सनदी लेखापालाकडून प्रमाणीत केलेली प्रत . |
| ७ | संस्थेच्या सभासदांची यादी. |
| ८ | ज्या संस्था सन २००८ किंवा त्यापासून पूढे कोणत्याही गोदामातील अन्नधान्य हाताळणूकीचे काम करत आहेत, अशा संस्थांनी पूर्वीच्या कामाच्या ठिकाणची मजुरी व त्यावरील लेव्ही , ज्या जिल्हयांमध्ये मजूरी रोख दिली जात होती अशा जिल्हयांच्या बाबतीत मजूरीवरील संपूर्ण लेव्ही व थकीत महागाई निर्देशांक वाढ प्राप्त झालेली असल्यास, त्यावरील संपूर्ण लेव्ही माथाडी मंडळात भरणा केल्याबाबतचे माथाडी मंडळाचे विधीग्राह्य प्रमाणपत्र. |

१०.६ तांत्रीक लिफाफा "अ" मधील कागदपत्रांची पुर्तता निविदा सादर करताना पूर्ण करण्यात यावी. तांत्रीक लिफाफा उघडल्यानंतर ऐनवेळी कोणत्याही प्रकारची नवीन कागदपत्रे स्विकारण्यात येणार नाहीत. तांत्रीक लिफाफ्यातील कागदपत्रात व अटी /शर्तीत नमूद केलेल्या अर्हतेपेक्षा कमी अर्हता आढळल्यास निविदा अपात्र ठरविण्यात येईल.

१०.७ शासनाला स्पर्धात्मक दर प्राप्त होण्यासाठी ख-याखु-या निविदाकारांना जास्तीत जास्त संख्येने निविदांमध्ये सहभागी होण्याची संधी देणे आवश्यक आहे. हा दृष्टीकोन ठेऊन विहित केलेल्या अत्यावश्यक कागदपत्रांमध्ये काही किरकोळ स्वरूपाच्या त्रृटी राहील्यास (उदा. शपथपत्रे, सांक्षांकित नसलेली कागदपत्रे इत्यादी ) व अशा त्रृटीची पूर्तता करण्यासाठी पाच दिवसांची मुदत निविदाकार संस्था/ निविदाकारांना देण्यात येईल. अशा त्रृटी या वेळेत पूर्ण करता आल्या नाहीत तर ती निविदा अपात्र ठरविण्यात येईल.

१०.८ निविदा प्रक्रियेदरम्यान तांत्रीक लिफाफा "अ" उघडल्यानंतर व वरील १०.७ नुसारची कार्यवाही पुर्ण झाल्यावर व्यापारी दराचा लिफाफा "ब" उघडण्यापुर्वी कोणत्याही निविदाकार संस्था/ निविदाकारांचे तांत्रीक लिफाफ्यासंदर्भात कोणतेही आक्षेप असल्यास अशा निविदाधारकांनी २ दिवसात लेखी आक्षेप घ्यावेत, त्यांनतर कोणतेही आक्षेप मान्य करण्यात येणार नाही. तसेच कोणत्याही परिस्थितीत तोंडी आक्षेप मान्य करण्यात येणार नाही.

१०.९ निविदाकार संस्था/निविदाधारकांकडून तांत्रीक लिफाफा "अ" मध्ये आवश्यक असलेली कागदपत्रे सादर न केल्यास त्या निविदाकार संस्था/निविदाधारकाची निविदा अपात्र ठरविण्यात येईल. अशा निविदाकार संस्था/निविदाधारकाचा लिफाफा "ब" उघडण्यास अपात्र ठरत असल्याने, संबधित निविदाकार संस्था/ निविदाधारकाचा लिफाफा "ब" उघडण्याची व त्यातील दर विचारात घेण्याची लेखी किंवा तोंडी आग्रह / विनंती कोणत्याही परिस्थितीत ग्राह्य धरण्यात येणार नाही.

१०.१० निविदा प्रक्रियेदरम्यान तांत्रीक लिफाफा "अ" उघडल्यानंतर निविदाकार संस्था/ निविदाधारकांचे तांत्रीक लिफाफ्या संदर्भात कोणतेही आक्षेप नसल्यास सर्व पात्र व अपात्र निविदाकार संस्था/ निविदाधारकांकडून आक्षेप नसल्याबाबत लेखी घेण्यात येईल. आक्षेप असल्यास त्यांचे निराकरण करून दराचा लिफाफा उघडण्यात येईल. लिफाफा "ब" उघडल्यानंतर प्राप्त झालेल्या आक्षेपांचा विचार करण्यात येणार नाही.

**१०.११** निविदा अथवा निविदेमध्ये कोणतीही अट अथवा पर्याय निविदाकार संस्था/ निविदाधारकास देता येणार नाही. अशा अटीयुक्त निविदा अपात्र ठरविण्यात येईल.

**१०.१२** प्रथम निविदेअंती तांत्रीकदृष्टया (तांत्रीक कागदपत्रांच्या तपासणीअंती ) ३ पेक्षा कमी ग्राह्य निविदा प्राप्त झाल्यास फेर निविदा काढण्यात येईल.

**१०.१३** फेर निविदा कालावधीच्या अंतिम दिनांकापर्यंत ३ पेक्षा कमी निविदाकार सहभागी झाल्याचे दिसून आल्यास निविदा प्रक्रियेस किमान ७ दिवसांची पहिली मुदतवाढ देण्यात येईल.

यावेळीही ३ पेक्षा कमी निविदा प्राप्त झाल्यास, निविदा सादर करण्यास पुन्हा ७ दिवसाची दुसरी मुदतवाढ देण्यात येईल. दोन्ही मुदतवाढीनंतर तीन किंवा त्यापेक्षा अधिक निविदा प्राप्त झाल्यास तांत्रीक लिफाफा "अ" व त्यात पात्र ठरलेल्या निविदाकारांचा लिफाफा"ब"उघडण्याची कार्यवाही करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी, नागपूर यांना राहील.

मुदतवाढीनंतरही ३ पेक्षा कमी मात्र किमान १ निविदा प्राप्त झाल्यास सदर निविदा उघडून त्यातील तांत्रीक कागदपत्रांची तपासणीअंती ती योग्य असल्यास दराचा लिफाफा "ब" मा.विभागीय आयुक्त यांच्यासमोर उघडण्यात येईल.

१०.१४ निविदाकार संस्था/ निविदाकाराने शासन निर्णयातील सर्व तरतूदी, प्रत्यक्ष खर्च / नफा या बाबी विचारात घेऊन हमाल कामगाराच्या बाबनिहाय आधारभूत दरांच्या टक्केवारीच्या प्रमाणात स्पर्धात्मक दर निविदेत नमूद करावेत. मागाहून दरातील बदलाबाबतची विनंती अथवा कोणत्याही प्रकारच्या तक्रारीची दखल घेण्यात येणार नाही. तसेच हमाल कामगारांना द्यावयाच्या दराबाबत कोणतेही न्यायिक प्रकरण उद्भवल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी निविदाकार संस्था/ निविदाकाराची राहील.

११. निविदा मंजुरीचे प्राधिकार व कार्यपध्दती :-

निविदा प्रक्रिया पारदर्शी पध्दतीने राबविण्यासाठी व वाजवी दर मंजुर होण्याकरिता खालीलप्रमाणे जिल्हास्तरीय समितीची स्थापना करण्यात येत आहे.

**११.१ जिल्हास्तरीय समिती** :-

जिल्हास्तरावर हमालीच्या बाबनिहाय आधारभूत दरांवर २५ टक्क्यांपर्यंत स्पर्धात्मक दरांच्या निविदा मंजूर करण्याचे अधिकार जिल्हास्तरीय समितीस राहील.

**११.१.१ हमाल कंत्राटाची जिल्हास्तरीय समिती पुढीलप्रमाणे राहील**.

| **अ.क्र.** | **जिल्हास्तरीय समितीतील अधिका-यांचे पदनाम** | **जिल्हास्तरीय समितीत धारण केलेले पद** |
|---|---|---|
| १ | मा.जिल्हाधिकारी, नागपूर | अध्यक्ष |
| २ | जिल्हा पूरवठा अधिकारी, नागपूर | सदस्य सचिव |
| ३ | अन्नधान्य वितरण अधिकारी, नागपूर | सदस्य |
| ४ | जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर | सदस्य |
| ५ | नागपूर जिल्हयाच्या माथाडी मंडळाचे अध्यक्ष | सदस्य |

११.१.२ निविदेतील दराचा लिफाफा "ब" उघडल्यानंतर निविदेतील दर हे हमालीच्या बाबनिहाय आधारभूत दरांच्या २५ टक्केपेक्षा जास्त आल्यास याबाबतचा सदर प्रस्ताव राज्यस्तरावरील समितीकडे एका आठवडयाच्या आत सादर करण्यात येईल.

११.१.३ जिल्हास्तरीय समितीला निविदा उघडलयाच्या दिनांकापासून एका कॅलेंडर महिन्याच्या आत **हमालीच्या बाबनिहाय आधारभूत दरांवर २५ टक्के या मर्यादेपर्यंत निविदा मंजूर करण्याचे आधिकार राहील**. एका महिण्याच्या आत निविदा मंजूरीचा निर्णय न झाल्यास प्रकरण शासनाकडे सादर करण्यात येईल.

**११.२ राज्यस्तरीय समिती** :-

**हमालीच्या बाबनिहाय आधारभूत दरांवर २५ टक्केपेक्षा जास्त दर प्राप्त झालेल्या निविदांना मंजूरी देण्याचे अधिकार राज्यस्तरीय समितीला राहील**.

**१२. निविदेतील दरांची विधी**ग्राह्यता :-

निविदा उघडल्यानंतर दराबाबतचा कोणताही बदल स्विकारण्यात येणार नाही. सर्व निविदाकार संस्था/निविदाराकारांची दरपत्रके निविदा उघडण्याच्या तारखेपासून १२० दिवस विधीग्राह्य राहतील. मात्र या कालावधीमधून निविदा प्रक्रियेबाबत न्यायालयीन प्रकरण उद्भवल्यास त्यासाठी लागणारा कालावधी वगळण्यात येईल.

**१३. जिल्हा पुरवठा कार्यालय, नागपूर व हमाल कंत्राटदार संस्थांच्या जबाबदा-या :-**

१३.१ हमाल कामगारांचे वेतन (मजुरी), व कंत्राटदाराचे निविदेतील मंजूर स्पर्धात्मक दर याची वेगवेगळी देयके कंत्राटदार संस्थेस अदा करण्यात यावीत.

१३.२ **अ**) हमाल कंत्राटदार संस्थानी, माथाडी कायद्यातील तरतुदीनुसार नोंदीत हमाल कामगारांची मजूरी प्रत्येक माहिन्याच्या ५ तारखेपर्यंत माथाडी मंडळात ऑनलाईन पध्दतीने अथवा धनाकर्षाव्दारे जमा करणे बंधनकारक राहिल.

**ब**) त्याचप्रमाणे जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी नोंदीत हमाल कामगारांची जिल्हा माथाडी मंडळाने घोषित केलेली लेव्हीची रक्कम प्रत्येक माहिन्याच्या १५ तारखेपर्यंत माथाडी मंडळाकडे ऑनलाईन पध्दतीने अथवा धनाकर्षाव्दारे जमा करणे बंधनकारक राहिल.

**क**) मजूरीच्या रक्कमेची अदायगी (प्रतिपुर्ती) हमाल कंत्राटदार संस्थेस जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी १० तारखेपर्यंत करावी.

**माथाडी मंडळाकडून हमालांचे वेतन त्यांच्या बचत खात्यावर ऑनलाईन जमा करावे लागेल. तसेच हमाल कामगारांना रोख वेतन दिले जाणार नाही याची निविदाकार संस्था/ निविदाकारांनी नोंद घ्यावी**.

**१३.३** माथाडी कायाद्यातील तरतूदीनुसार माथाडी मंडळाकडे जमा करण्यात येणा-या लेव्हीच्या रकमेतून माथाडी कामगारांसाठी माथाडी कायदा व त्या खालील योजनेनुसार सामाजिक सुरक्षितता व कल्याणकारी योजनेचे फायदे माथाडी मंडळाने उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी माथाडी मंडळाकडे जमा करण्यात येणा-या लेव्हीच्या रक्कमेतुन बाबनिहाय खर्चाचे विनियोजन करण्यात आले आहे किंवा कसे याबाबतचे प्रमाणपत्र प्राप्त झाल्याशिवाय पुढील महिन्याच्या लेव्हीची अदायगी माथाडी मंडळाकडे करु नये. बाबनिहाय खर्चाचे विनियोजनाबाबतचे प्रमाणपत्र माथाडी मंडळाकडून प्राप्त होईल याची दक्षता जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी घ्यावी.

**१३.४** कंत्राटदार संस्थेने मजुरीची रक्कम विहित वेळेत न भरल्यास प्रथम वेळेस संस्थेस लेखी समज देण्यात येईल. व्दितीय वेळी संस्थेने सदरच्या रक्कमेचा भरणा विहित वेळेत न केल्यास नोटीस देऊन संस्थेस देण्यात येणा-या बाबनिहाय आधारभूत दरावरील स्पर्धात्मक दरातून २५% रक्कम दंड म्हणुन कपात करण्यात येईल. त्रितीय वेळी संस्थेने सदरच्या रक्कमा विहित वेळेत न भरल्यास संस्थेस नोटीस देऊन कंत्राट रद्द करावे व पुढील वर्षभर संस्थेस शासकीय गोदामातील हमाल कंत्राट निविदा प्रक्रियेत भाग घेण्यास मज्जाव करण्यात येईल. मात्र उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करतांना जिल्हा पुरवठा

कार्यालयाकडून संस्थेस देय असलेली देणी वेळीच दिलेली असणे आवश्यक राहील, याची नोंद घ्यावी.

१३.५ हमाल कामगार संस्थांना देयके सादर करण्यासाठी या कार्यालयाकडुन निश्चित दिनांक तक्ता तयार करून देण्यात येईल.

१३.६ प्रत्येक वर्षीच्या मार्च महिन्यामध्ये महागाई निर्देशांकानुसार दरवाढ परिगणित झाल्यावर दरातील वाढीनुसार त्यापुढील कालावधीची मासीक देयके निघतील.त्यासाठी संबंधित गोदामपालाकडे दरांमध्ये झालेली सुधारणा तातडीने कळविण्यात येईल. जेणेकरून प्रत्येक महिण्यात तयार होणारी हमालीची देयके ही महागाई निर्देशांकानुसार झालेल्या वाढीसह सादर होतील व हमाल कामगारांना महागाई निर्देशांकाच्या वाढीसह वेतन मिळेल.

१३.७ कंत्राट मंजूर झालेल्या संबंधित संस्था/ कंत्राटदार यांना माथाडी मंडळाच्या सर्व अटी व शर्ती लागू राहतील. जिल्हाधिकारी / जिल्हा पूरवठा आधिकारी, नागपूर / अन्नधान्य वितरण अधिकारी , नागपूर हे माथाडी मंडळात मुख्य मालक राहतील. कंत्राटदाराने माथाडी कायदा व योजनेतील तरतुदीचे उल्लंघन केल्यास मुख्य मालक म्हणून माथाडी कायद्यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल.

१३.८ शासकीय गोदामातील अन्नधान्य हाताळणूकीचे काम “अत्यावश्यक सेवेमध्ये ” येत असल्याने, शासकीय धान्य गोदामात काम करणा-या कामगारांना संप / काम बंद आंदोलन इत्यादी प्रकारे कामात व्यत्यय आणता येणार नाही. अशा प्रकारे कामात व्यत्यय आणणा-या कामगारांवर कंत्राटदार संस्थेकडून / माथाडी मंडळाने नोंदणी रद्द करणेबाबत माथाडी कायदयातील तरतुदीनुसार तातडीने कार्यवाही करावी लागेल. या संबंधीची सर्व जबाबदारी कंत्राटदार संस्था/ माथाडी मंडळाची राहील.

१३.९ हमाल कंत्राट मंजूर होणा-या कंत्राटदार संस्थेस कंत्राट कालावधीत माथाडी मंडळाच्या नियमातील अटी व शर्तीचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक राहील. ज्या कंत्राटदार संस्था यांचे काटेकोरपणे पालन करणार नाहीत किंवा शासकीय कामामध्ये अडथळे आणतील त्या कंत्राटदार संस्थेचे काम तात्काळ बंद करून, करारनामा रद्द करण्यात येईल. त्यानंतर नविन निविदा प्रक्रिया राबविण्यात येईल. तोपर्यंत परिच्छेद १७ नुसार कार्यवाही करण्यात येईल.

१३.१० शासकीय गोदामातील कामामध्ये सातत्य रहावे, त्याचप्रमाणे ते हमालांच्या कमतरतेमुळे / अनुपस्थितीमुळे खोळंबून राहू नये, यासाठी आवश्यक ते हमाल कामगार उपलब्ध करून देण्याची विनंती माथाडी मंडळाकडे करण्यात यावी. गोदामामध्ये कामाच्या दिवशी आलेल्या ट्रकमधील अन्नधान्य कोणत्याही परिस्थितीत त्याचदिवशी गोदामात रिकामे करुन घेण्यासाठी वाहतूक कंत्राटदार व हमाल कंत्राटदार यांनी योग्य तो समन्वय ठेवून धान्य उतरवून घेण्यासाठीचे नियोजन करावे. यासाठी माथाडी मंडळाकडून अतिरिक्त नोंदीत हमाल कामगारांचा पुरवठा न झाल्यास तात्पुरत्या स्वरुपात तातडीने हमाल उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी संबंधित हमाल कंत्राटदार संस्थेची राहील.

१३.११ शासकीय गोदामामध्ये अन्नधान्याचे प्रमाणिकरण हे हमाल कामगारांमार्फत करण्यात येते. प्रमाणीकरणामध्ये प्रत्येक गोणी ही ५० किलो धान्याची बनविली जाते.सदर प्रमाणीकरणाच्या अचुकतेबाबत यापूढे गोदामपाला बरोबरच हमाल कंत्राटदार संस्थेसही जबाबदार धरण्यात येईल. यासाठी L रजिस्टर, E रजिस्टर व E-१ रजिस्टरवर संस्थेचा सुपरवायझर/ लिपिक/ संस्थेने नियुक्त केलेली व्यक्ती यांची सही घेण्यात येईल.

१३.१२ ज्या संस्थेची हमाल कंत्राटदार म्हणून निवड करण्यात येईल, त्या संस्थेने करारनामा करण्यापूर्वी शासकीय गोदामात प्रत्यक्ष काम करत असलेल्या हमालांची माथाडी मंडळाकडे नोंदणी करून घेणे व त्यांना ओळखपत्र देणे बंधनकारक राहील.

**१४. वाटाघाटी करण्याबाबत :-**

एल-१ व्यतिरिक्त अन्य कोणाशीही वाटाघाटी करण्यात येणार नाहीत. एल-१ सोबत करण्यात येणा-या वाटाघाटी देखील उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या दि.१ डिसेंबर २०१६ रोजीच्या शासन निर्णयातील परि. ४.४.४.१ मधील तरतूदीनुसार करण्यात येईल.

**१५. निविदाकाराने करारनामा न केल्यास :-**

**१५.१** मंजूर निविदाकारास निविदा मंजूरीनंतर ७ दिवसाचे आत सर्व कागदपत्रांची पुर्तता करून रूपये १००/- च्या स्टॅम्प पेपरवर विहित नमुन्यात करारनामा करणे बंधनकारक राहील.

**१५.२** प्रथम निविदाकार करारनामा करण्यास असमर्थ ठरल्यास निविदा प्रक्रिया रद्द करून फेरनिविदा बोलविण्यात येतील. अशा फेरनिविदा प्रक्रियेत पहिल्या निविदेत करारनामा करण्यास नकार देणा-या निविदाकार संस्था/निविदाकारास प्रतिबंधित करण्यात येईल.

**१५.३** निविदा सादर केल्यानंतर निविदाकार हा निविदेच्या तसेच करारनाम्यातील तरतुदींना बांधील राहील. न्यूनतम दर असलेल्या निविदाकाराने करारनामा करण्यास नकार दिल्यास अथवा टाळाटाळ केल्यामुळे अथवा आदेश देवूनही काम न केल्यामूळे, अथवा फेर निविदा मागवून मंजूर केल्यामुळे, शासनाने खर्च करावयाची अतिरिक्त रक्कम, स्टेट बॅक ऑफ इंडियाच्या "**पी.एल.आर**. (**Prime Lending Rate**) **अधिक दोन टक्के**" व्याजासह करारनामा न केलेल्या निविदाकाराकडून वसूल करण्यात येईल.सदर वसूली जमीन महसुलीच्या थकबाकीची वसूली म्हणून करण्यात येईल.

**१६. करारनाम्यास मंजूरी** :-

**१६.१** शासनाच्या वतीने निविदाकारासोबत करारनामा करण्यासाठी जिल्हाधिकारी, नागपूर यांना प्राधिकृत करण्यात आलेले आहे.

**१६.२** या शासन निर्णयानुसार खुली ई-निविदा प्रक्रिया राबवून निविदा मंजूर करण्यात आलेल्या निविदाकारासोबत करण्यात येणा-या करारनाम्यास शासन निर्णय दिनांक ८/५/२०१८ मधील सर्व तरतूदी लागू राहतील.

**१६.३** शासकीय गोदामातील अन्नधान्य हाताळणूक हमाल कंत्राट करारनाम्यावर जिल्हाधिकारी / जिल्हा पुरवठा अधिकारी, नागपूर व कंत्राटदार यांची स्वाक्षरी राहील.

१६.४ करारनाम्याच्या प्रत्येक पानावर व दुरूस्तीच्या ठिकाणी जिल्हाधिकारी / जिल्हा पुरवठा अधिकारी, नागपूर व कंत्राटदार यांची स्वाक्षरी आवश्यक राहील.

**१७. कंत्राटदार काम करण्यास अपयशी ठरल्यास करावयाची कार्यवाही** :-

शासकीय गोदामातील अन्नधान्य हाताळणूकीचा कंत्राटदार संस्था/ कंत्राटदार काम करण्यास अपयशी ठरल्यास किंवा करारनाम्याच्या कालावधीपूर्वी कंत्राट रद्द करण्यात आल्यास नवीन कंत्राट निश्चित होईपर्यंत अन्नधान्य हाताळणूकीसाठी खालील पर्यायानुसार तात्पुरती व्यवस्था करण्यात येईल.

(अ) लगतच्या शासकीय गोदामातील कंत्राटदारकडून न्यूनतम दराने अन्नधान्य हाताळणूकीचे काम करण्यात येईल.

(ब) नोंदणीकृत हमाल कामगार सहकारी संस्थेकडून दरपत्रके मागविण्यात येईल. त्यांचेकडून प्राप्त होणा-या दरपत्रकातील सर्वात कमी दर वाटाघाटी करून स्विकारण्यात येईल.

(क) शासकीय गोदामातील अन्नधान्य हाताळणूकीचे काम जिल्हाधिकारी कार्यालयाकडून करण्यात येईल.

**१८. आयकर कपात करणे** :-

भारत सरकारच्या वित्त मंत्रालयाच्या दि. ८/१०/१९९३ च्या परिपत्रकातील परिच्छेद क्र.५.३ नुसार सर्व प्रकारच्या कंत्राटांना आयकर अधिनियम १९६१ च्या कलम १९४ (सी) ची तरतुद लागू आहे.त्यानुसार वित्तीय सल्लागार व उपसचिव यांच्याकडील परिपत्रक क्र. का-१/३९८/७९२२ दिनांक ९ डिसेंबर १९९६ अन्वये हमाली कामाच्या देयकातून केंद्र शासनाच्या प्रचलित नियमानुसार आयकर कपात करण्यात येईल.

**१९. प्रारूप करारनामा** :-

शासकीय गोदामातील अन्नधान्य हाताळणूकीच्या कंत्राटासाठी करावयाचा करारनामा शासन निर्णय दिनांक ८ मे २०१८ मधील परिशिष्ट-अ मधील प्रारूप करारनाम्यानुसार करारनामा करण्यात येईल.

२०. शासकीय गोदामातील अन्नधान्य हाताळणूकीचा हमाल कंत्राट शासन निर्णय दिनांक ८ मे २०१८ निर्गमित झाल्यामुळे दिनांक १२ सप्टेंबर २०१४ रोजीचा शासन निर्णय शासनाने रद्द केलेला आहे.

२१. या शासन निर्णयानुसार होणा-या हमाल कंत्राटामध्ये लेव्ही भरण्याची जबाबदारी जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्यावर सोपविण्यात येत आहे.

**२२. करारनाम्यातील तरतुदी संदर्भात वाद विवाद व अपिल** :-

२२.१ करारनाम्याच्या कालावधीत किंवा तद्नंतर करारनाम्यातील तरतूदी संदर्भात तसेच दंड, वसूली, कंत्राट रद्द करणे इ. संदर्भात जिल्हाधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाविरूध्द निर्णय दिल्याच्या दिनांकापासून ३० दिवसात कंत्राटदार संस्थेस विभागीय आयुक्त, नागपूर यांचेकडे दाद मागता येईल.

२२.२ विभागीय आयुक्त यांच्या निर्णयाने समाधान न झाल्यास, सदर आदेश पारित झालेल्या दिनांकापासून ३० दिवसात विभागीय आयुक्त यांच्या निर्णयाविरूध्द कंत्राटदार संस्था शासनाकडे अपिल करू शकतो.

२२.३ हमाल कंत्राटदार संस्था यांनी आपल्या तक्रारीचे निराकरण करण्यासाठी उपलब्ध असणा-या वैध मार्गाचा अवलंब केल्याशिवाय त्यांना न्यायालयात दाद मागता येणार नाही.

## २३. करारनाम्यातील अटी व शर्ती-

१. संस्था माथाडी मंडळाकडे मालक म्हणुन नोंदीत असल्याबाबतचे प्रमाणत्र.

२. ज्या निविदाकार संस्थेची /निविदाकाराची निविदा मंजूर करण्यात येईल त्यांनी शासकीय गोदामामध्ये जे माथाडी मंडळाकडील नोंदीत कामगार पुर्वीपासून काम करत आहेत त्यांच्याकडूनच काम करून घेईल व त्यांना संस्थेचे कामगार म्हणून त्यांची माथाडी मंडळाकडे नोंदणी करेल.

३. कंत्राटदार संस्थेस हमाल कामगारांना माथाडी मंडळाने ठरवून दिलेल्या आधारभूत दरापेक्षा कमी दर देता येणार नाही. कंत्राटदार संस्थेस मालक म्हणून माथाडी कामगारांच्या मजूरीची रक्कम ही किमान वेतनापेक्षा किंवा मंडळाने ठरवून दिलेल्या दरापेक्षा कमी राहणार नाही.

४. काही कारणास्तव शासकीय गोदामातील काम कायमस्वरूपी बंद पडल्यास अथवा शासनाने बंद करण्याचा निर्णय घेतल्यास हमालांना काम देण्याची जबाबदारी शासनाची असणार नसुन त्या त्या हमाल कंत्राटदार संस्थेची किंवा मंडळाची राहील.

५. कंत्राटदार संस्था आपल्या स्वतःच्या हमाल कामगारामार्फत या प्रयोजनासाठी शासनाने राखून ठेवलेल्या किंवा बांधलेल्या गोदामांमध्ये आणि शासनाने उघडलेल्या खरेदी केंद्रावर किंवा जेथे शासनास अशी सेवा आवश्यक वाटेल त्या अन्य ठिकाणी माल भरणे व उतरवणे यासह आणि विशेषतः याखाली लिहलेल्या अनुसुचित वर्णन केलेल्या कामांच्या बाबी आणि तया प्रत्येक बाबीसाठी माथाडी मंडळाने विनिर्दिष्ट केलेल्या दराने, माल भरण्याचे , उचलण्याचे व तदनुषंगिक व संलग्न काम करतील.

## २४. शासन, कंत्राटदार संस्थेला कामाच्या बाबीनुसार पुढीलप्रमाणे नमूद केलेल्या दरांनी केलेल्या कामासाठी मोबदला देईल. मात्र

१. ४७ किलो ग्रॅम ते ५५ किलो ग्रॅम वजनाच्या गोण्याकरिता विहित केलेल्या कामाच्या बाबींचे पूर्ण दर कंत्राटदार संस्थेस चुकते केले जातील.

२. कंत्राटदार संस्थेला कोणत्याही मजूरीच्या कामाच्या बाबींमध्ये नमूद केलेले कोणतेही काम करण्याची आवश्यकता वाटली नाही तर ती किंवा ते काम कंत्राटदार संस्थेने कोणत्याही कारणास्तव केले नाही तर न केलेल्या मजूरीच्या कामासाठी संस्थेला नोटीस दिल्यांनतर मंजूर दरामधून ठराविक प्रमाणात रक्कम कमी करण्यात येईल.

३. धान्य स्वच्छ करणे व रूपांतर करणे याबाबींसाठी असलेल्या दराने भूस कांडयातून सर्व खाद्य धान्य इत्यादी वेगळे करण्यासाठी जिल्हाधिकारी यांना जेव्हा जेव्हा आवश्यक वाटेल तेव्हा तेव्हा कंत्राटदार संस्था कोणतीही गौण उत्पादने असल्यास ती नुकसानीपासून वाचवण्याचे व ती पुन्हा साफ करण्याचे देखील काम करेल.

४. करार निर्दिष्ट दरांविरूध्द स्पष्टपणे उपबंधित केले नसेल तर त्या दरांमध्ये गोदामाच्या आकारमानुसार व जमिनीच्या स्वरूपानुसार त्यांच्या भिन्नतेच्या अधिन राहून गोण्या भरणे, उचलणे आणि त्यांची सुमारे १६ थर उंचीपर्यंत थप्पी लावणे यांचा समावेश होतो. जिल्हाधिकारी जेव्हा आदेश देतील तेव्हा थप्पी लावण्याची उंची वाढवण्यात येईल. त्यासाठी कंत्राटदार संस्थेला विहित केलेल्या दराहून अधिक प्रदान केले जाणार नाही.

५. कंत्राटदार संस्थेला जिल्हाधिकारी यांच्या सुचनेनुसार तसे आवश्यक असेल तर ज्यासाठी दर विहित केलेले नसतील अशा कामाच्या बाबी पार पाडील आणि शासनाच्या मान्यता घेवून नंतर जिल्हाधिकारी यांनी निश्चित केलेल्या दराने अशा कामासाठी कंत्राटदार संस्थेस प्रदान करेल.

६. कंत्राटदार संस्था एकाच गोदामातून एका ठिकाणाहून दुस-या ठिकाणी किंवा यथास्थिती एकाच ठिकाणामधील एका गोदामातून दुस-या गोदामामध्ये, तिच्या मजुरीच्या कामासाठी आवश्यक असलेली तराजुची तागडी लोखंडी कैची, वजने, ताडपत्र्या, हॉपर यंत्रे, उफण्णी यंत्रे, पोती शिवण यंत्रे, हँगीग हुक, चाळण्या (मेशेस) आणि अन्य तत्सम उपकरणे किंवा गोदामासाठीची साधन सामग्री वाहून नेईल आणि या कामासाठी कंत्राटदार संस्थेस स्वतंत्र मजूरी खर्च मिळणार नाही.

७. दिवसाचे काम करण्यात आल्यावर उपरोक्त खंड (६) मध्ये नमूद केलेली हॉपर यंत्रे, पोती शिवण यंत्रे, हँगीग हुक, इत्यादी सारखी मजूरीसाठी लागणारी सर्व अवजारे संस्था संबंधित गोदाम रक्षकाने दाखविल्याप्रमाणे योग्य जागी ठेवेल.

८. मजुरीचे काम सर्वसाधारणपणे सकाळी ८.०० वाजता सुरू होईल आणि सायंकाळी ६.०० वाजता संपेल. परंतु यास गोदाम रक्षक, गोदाम व्यवस्थापक किंवा गोदाम अधिकारी किंवा याबाबतीत जिल्हाधिका-याने प्राधिकृत केलेल्या अशा अन्य अधिका-यांच्या स्वेच्छाधिकारात त्या दिवसाच्या गरजेनुसार दिवसा सकाळी काम लवकर सुरू करण्यात येऊन संध्याकाळी उशिरा बंद करण्यात आले तरी अधिक तास काम करण्यात आल्यामुळे बाधा येणार नाही, अशा जादा तासांसाठी अतिकालिक भत्याच्या स्वरूपात अतिरिक्त रक्कम दिल्या जाणार नाही.

गोदामामध्ये कामाच्या दिवशी आलेल्या ट्रकमधील अन्नधान्य कोणत्याही परिस्थितीत त्याचदिवशी गोदामात रिकामे करुन घेण्यासाठी वाहतूक कंत्राटदार व हमाल कंत्राटदार यांनी योग्य तो समन्वय ठेवून धान्य उतरवून घेण्यासाठीचे नियोजन करावे.

९. कंत्राटदार संस्था तिच्या कामगाराकडून धान्य हाताळताना ते वाया जात नाही, त्याची हानी होत नाही याची काळजी घेईल.

१०. कंत्राटदार संस्था जेव्हा आवश्यक वाटेल तेव्हा, अनूकुल मोसमात धान्य स्वच्छ व रुपांतरीत करण्याचे काम गोदामाबाहेर करू शकेल.

११. कंत्राटदार संस्था शासकीय गोदामातील अन्नधान्य हाताळणूकीच्या कामासाठी नेमलेल्या कामगारांना किंवा मजूरांना माथाडी मंडळा मार्फत दर महिन्याचे वेतन नियमितपणे ऑनलाईन पध्दतीने प्रदान करेल. आणि कंत्राटदार संस्थेने तसे करण्यांत कसूर केली तर या कामासाठी संस्थेला देय असलेल्या रकमेतून तात्पुरते प्रदान करून कामगारांना / मजुरांना अग्रीम देण्याचे आणि जिल्हाधिकारी यांनी केलेल्या अशा सर्व प्रदानांसाठी स्वतः प्रतिपुर्ती करण्याचे स्वातंत्र जिल्हाधिकारी यांना राहील.

१२. कंत्राटदार संस्थेच्या मजुरांना किंवा कामगारांना **शासकीय धान्य गोदामात** काम करतांना कोणतीही दुखापत झाल्यास किंवा इजा पोहचल्यास त्याकरिता कंत्राटदार संस्था जबाबदार राहील आणि श्रमिक भरपाई अधिनियमाखाली देय असलेली कोणतीही नुकसान भरपाईची रक्कम किंवा नुकसान भरपाईच्या रकमा चुकत्या करण्यास जबाबदार असेल. उक्त अधिनियमाअन्वये अशी कोणतीही नुकसान भरपाई जिल्हाधिकारी यांना चुकती करावी लागल्यास कंत्राटदार संस्थेने मागणी केल्यावर जिल्हाधिकारी यांना अशाप्रकारे चुकत्या केलेल्या सर्व रकमा कंत्राटदार संस्था परत करेल आणि शासनाकडे अशा सर्व दाव्यांची व खर्चाची पूर्णतः क्षतिपूर्ती करेल.

१३. या करारनाम्यातील अटींचे व शर्तीचे योग्य पालन व अनुपालन करण्यासाठी कंत्राटदार संस्थेस जिल्हाधिकारी यांना शासन निर्णयातील तरतूदीनुसार अनामत रक्कम व प्रतिभूती ठेव कोषागारात रोख रकमेत किंवा शासकीय वचन पत्राव्दारे जमा करू शकेल. कंत्राटदार संस्थेकडून या करारनाम्यातील कोणत्याही अटींचा व शर्तीचा भंग झाल्यास, शासनाला (हा करार समाप्त करण्यासह) इतर कोणत्याही कायदेशीर उपायांना बाधा न येता, अशा उल्लंघनाबद्दल किंवा या करारानुसार शासनाने किंवा शासनाच्या वतीने जिल्हाधिकारी हे कंत्राटदार संस्थेकडून किंवा तिच्या नावाने केलेल्या किंवा कोणत्याही वेळी करण्यात येतील अशा कोणत्याही इतर मागण्यांच्या पुर्ततेसाठी किंवा त्या बाबतीत शासनाच्या किंवा या अन्वये शासनाला देय असलेल्या कोणत्याही रक्कमेची पूर्तता करण्यासाठी शास्ती किंवा निर्धारीत भरपाई म्हणून अनामत ठेवीची संपूर्ण रक्कम किंवा तिचा भाग समपहृत किंवा समायोजीत न

करण्यात आलेली अशी ठेव किंवा तिचा भाग हा करार समाप्त झाल्यानंतर कंत्राटदार संस्थेला चुकता किंवा हस्तांतरीत करण्यात येईल.

१४. कंत्राटदार संस्था या कराराअन्वये त्यांनी हाती घेतलेले मजूरीचे काम त्या त्या दिवशी तत्परतेने पार पाडेल आणि हे काम कंत्राटदार संस्थेमुळे कोणत्याही प्रकारे थांबविल्यास किंवा त्यांच्या मजुरांनी किंवा कामगारांनी हे काम करण्यास नकार दिल्यामुळे किंवा तिच्या नियंत्रणाबाहेर नसलेल्या कोणत्याही कारणांमूळे या कामास विलंब झाल्यास, जिल्हाधिकारी हे कंत्राटदार संस्थेकडून अशा विलंबामुळे किंवा कसुरीमुळे जिल्हाधिकारी यांना ज्या पर्यायी व्यवस्था कराव्या लागतील त्या व्यवस्थांवरील कोणत्याही अतिरिक्त खर्चामुळे झालेल्या हानीची कोणतीही रक्कम वसुल करण्याचा अधिकार जिल्हाधिकारी यांना राहील. अशा प्रसंगी जिल्हाधिकारी शास्तीच्या स्वरूपात आणि शासनाला झालेली हानी भरून काढण्यासाठी अनामत/प्रतिभूती ठेव किंवा तिचा कोणताही भाग जप्त करेल. जिल्हाधिकारी शास्ती व नुकसान भरपाईची रक्कम निश्चित करेल व कंत्राटदार संस्थेला अशा शास्तीच्या व नुकसान भरपाईच्या रक्कमा कळविल्यानंतर ती लगेचच आवश्यक ते आणखी प्रदान किंवा प्रदाने करून ठेव रूपये ---- च्या मुळ रकमेत पुन्हा ठेवेल.

१५. जिल्हयातील तालुकांतर्गत असलेल्या शासकीय गोदामातील अन्नधान्याच्या हाताळणुकीसाठी हमाल कंत्राटाचा कालावधी त्या त्या जिल्हयातील चालू वाहतूक कंत्राट संपेपर्यंत किंवा ३ वर्षे यापैकी जे अगोदर घडेल तितका असेल. ज्या तारखेला निविदाकाराशी करारनामा करण्यात येईल, त्या तारखेपासून कालावधी सुरु होऊन तो वरील प्रमाणे विहित कालावधीकरीता असेल. जेव्हा आवश्यकता असेल तेव्हा कंत्राटाचा कालावधी दोन महिन्यापर्यंत वाढविण्यात येईल. तद्नंतर मुदतवाढीसाठी शासनाची मंजूरी घेण्यात येईल. परंतू जिल्हाधिकारी यांना कोणत्याही कारणास्तव कंत्राटदार संस्थेला एक महिन्याची लेखी नोटीस देवून हा करार समाप्त करू शकेल आणि अशा समाप्तीच्या वेळी कंत्राटदार संस्थेला नुकसान भरपाईसाठी दावा करता येणार नाही.

१६. जिल्हाधिकारी यांना त्यांच्या स्वेच्छधिकारात कंत्राटदार संस्थेला येथील खंड (१५) नुसार कामाच्या शेवटच्या दिवसापूर्वी कंत्राटदार संस्थेला वाढवून दिलेल्या कालावधीच्या पलीकडे दोन महिन्यांहून अधिक नसलेल्या अतिरिक्त कालावधीसाठी कंत्राटातील अटीनुसार व दरांनुसार काम करण्यास सांगू शकेल.

१७. जर कंत्राटदार संस्थेला किंवा तिच्या अधिकृत प्रतिनिधीस जीवनावश्यक सेवा अधिनियम १९५५ मधील तरतुदीनुसार अपराधी ठरविले असेल तर जिल्हाधिकारी त्यांच्या स्वेच्छाधिकारात नोटीस न देता कंत्राट समाप्त करील आणि अशाप्रकारे कंत्राट समाप्त केल्यामुळे संस्थेला जिल्हाधिकारी यांचेकडून कोणतीही नुकसान भरपाई मिळणार नाही.

१८. जिल्हाधिकारी हे त्यांच्या स्वेच्छाधिकारात संस्थेची कसूर, गैरवर्तणूक इत्यादी कारणामुळे देखील कंत्राट विखंडीत करू शकेल आणि अशाप्रकारे कंत्राट विखंडीत केल्यामुळे कंत्राटदारसंस्थेला कोणतीही नुकसान भरपाई मिळणार नाही

१९. शासकीय गोदामामध्ये अन्नधान्याच्या प्रमाणिकरणामध्ये प्रत्येक गोणी ही ५० किलोची बनविली जाते. सदर प्रमाणिकरणाच्या अचुकतेबाबत कंत्राटदार संस्थाही जबाबदार राहील. यासाठी L रजिस्टर, E रजिस्टर व E-१ रजिस्टर वर कंत्राटदार संस्थेचा सुपरवायझर /लिपिक /संस्थेने नियुक्त केलेली व्यक्ती सही करेल.

२०. लवाद अधिनियम १९४० च्या उपबंधाव्दारे या करारनाम्यातील तरतुदी सदंर्भात कोणताही वाद/विवाद उद्भवल्यास संबंधित विभागीय आयुक्तांकडे करारनामा समाप्त झाल्यापासुन सहा महिन्याच्या आत दाद मागता येईल. अशा लवादाचा निर्णय अंतिम व या कराराच्या दोन्ही पक्षांना बंधनकारक राहील.

२१. शासनाला देय असलेल्या किंवा ज्या दिनांकास शासनाला ही रक्कम प्रदान करावयाची होती त्या दिनांकापासून दरसाल ६% व्याजासह या कंत्राटाअन्वये शासनाकडून वसुली योग्य असलेल्या सर्व रकमा शासनाचे कोणतेही इतर हक्क आणि उपाययोजना यास बाधा न आणता जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसुली योग्य असल्याचे मानण्यात येईल.

२२. या लेखाच्या संबधातील मुद्रांक शुल्क संस्था भरेल व ते चुकते करेल.

२३. जिल्हाधिकारी यांनी दिलेल्या सुचनांचे पालन करण्यास कंत्राटदार संस्थेने कसूर केल्यास जिल्हाधिकारी किंवा त्याने प्राधिकृत केलेले अधिकारी हे कंत्राटदार संस्थेस लेखी स्वरूपात रीतसर नोटीस दिल्यानंतर कंत्राटदार संस्थेच्या जोखिमीवर, खर्चाने व अनुभवावर अन्य दुस-या संस्थेमार्फत किंवा अन्य कोणत्याही एजन्सीमार्फत पर्यायी व्यवस्था करील आणि या करिता शासनाला झालेल्या सर्व अतिरिक्त खर्च कंत्राटदार संस्थेकडून वसुल करण्यात येईल.

**२३.** सदर शासन निर्णय उद्योग,उर्जा व कामगार विभागाच्या मान्यतेने, तसेच वित्त विभागाने अनौपचारिक संदर्भ क्र. ९९/व्यय-१० दि. १७/३/२०१८ नुसार दिलेल्या मान्यतेने निर्गमीत करण्यात आलेले आहे.

२४. शासकीय गोदामातील अन्नधान्य हाताळणूकीचा हमाल कंत्राट शा.नि. दिनांक ८ मे २०१८ शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०१८०५०८१७३२३५५५०६ हा आहे.

**(मा.जिल्हाधिकारी यांचेद्वारे अनुमोदित)**

स्वाक्षरी /-

**जिल्हाधिकारी नागपूर,**

**करीता**